بِسۡمِ اللّٰهِ الرَّحۡمٰنِ الرَّحِيۡمِ　　نَحۡمَدُهٗ وَنُصَلِّیۡ عَلٰی رَسُوۡلِهِ الۡکَرِيۡمِ　　وَعَلٰی عَبۡدِهِ الۡمَسِيۡحِ الۡمَوۡعُوۡدِ
لَآ اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ مُحَمَّدٌ رَّسُوۡلُ اللّٰهِ
دفتر مجلس انصار اللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA
Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in　　محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# पदाधिकाऱ्यांचे कर्तव्य आणि जबाबदाऱ्या

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक १८ ऑगस्ट २०२३, मशिद मुबारक, टिलफोर्ड

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ. بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ. اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ. الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ. مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ. اِيَّاكَ نَعْبُدُ وَاِيَّاكَ نَسْتَعِيْنُ. اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ. صِرَاطَ الَّذِيْنَ اَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ.

तशह्हुद, तआवुज आणि सुरह फातिहानंतर हुजूर अनवर म्हणालेः सर्वशक्तिमान अल्लाह पवित्र कुरआनमध्ये सांगतो की, खरोखर अल्लाह तुम्हाला असा आदेश देत आहे, की जे (विश्वास) पात्र आहेत त्यांच्याकडेच ठेवी सोपवा. आणि एक ठिकाणी हदीस मध्ये नमूद आहे की पवित्र पैगंबर (स.) म्हणाले, कोणताही पद किंवा स्थान जर एखाद्याला प्रदान करण्यात आले आहे ज्याद्वारे तो लोकांचे गोष्टी हताळत आहे, तर ते देखील एक अनामत आहे. म्हणून या संज्ञेनुसार आमच्या व्यवस्थापनेतील प्रत्येक पद आणि सेवा ही अनामत आहे.

जमाअतीय व्यवस्थापनेतील सर्व स्तरावर पदाधिकारी निवडले जातात. म्हणून, अल्लाह आदेश देतो की जेव्हा तुम्ही या हेतूसाठी निवड कराल तेव्हा लक्षात ठेवा की निवडलेले लोक तेच आहेत जे भरवशाचा हक्क फेडतील.

निवडीच्या वेळी नातेसंबंधाचा विचार केला जाऊ नये. कधीकधी काही अधिकारी केंद्रीय किंवा खलिफाकडून नियुक्त केले जातात. यासाठी उपलब्ध असलेल्या सर्वोत्तम व्यक्तीचा विचार करून नियुक्ती करण्याचा प्रयत्न होतो. पण कधी कधी अंदाजात चूक होऊ शकते. किंवा पदे मिळाल्यावर लोकांचा स्वभाव बदलतो आणि नम्रता आणि मेहनतीची भावना गायब होते. तथापि, आपण प्रार्थनापूर्वक आपल्यातील सर्वोत्तम लोक निवडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सर्वसाधारणपणे, जी व्यक्ती पद मिळवण्यासाठी आतुर असतो अशा माणसाला पद दिले जात नाही, अशा व्यक्तिचे नाव जरी निवडणूकात आले तरी केंद्र प्रशासन समिती किंवा खलीफा, जर त्यांना त्याच्याबद्दल माहिती असेल, तर त्याला पद देत नाही. ही पद्धत पवित्र प्रेषित (स.) च्या निर्देशानुसार आहे. एकदा दोन लोक पवित्र प्रेषित (स.) यांच्याकडे आले आणि त्यांनी विचारले की अमुक अमुक सेवा आमच्याकडे सोपवावी, आम्ही त्यासाठी पात्र आहोत. पवित्र प्रेषित (स.) म्हणाले, ''ज्याला मी सेवा सोपवतो, सर्वशक्तिमान अल्लाह त्याला मदत करतो. जो स्वतः एखादे कार्य हाती घेऊ इच्छितो, सर्वशक्तिमान अल्लाह त्याला मदत करत नाही. आणि त्याचे कार्य कृपाहीन राहते.'' म्हणून कधीही पदाची इच्छा करू नये. होय! धर्मसेवेची आवड असावी. ते कोणत्याही रंगात असू शकते.

हुज़ूर अनवर म्हणाले: या वर्षी काही देशांमध्ये (ज़ैली तनज़ीम) पोटसंस्थांच्या निवडणुका होणार आहेत. या संघटनांच्या सदस्यांपैकी जो कोणी निवडणूक परिषदेचा सदस्य होईल त्याने अल्लाहच्या आदेशानुसार प्रार्थना आणि न्यायाने मतदानाचा हक्क बजावला पाहिजे.

यासोबतच मला अधिकाऱ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्यांची आठवण करून द्यायची आहे. अधिकाऱ्यांनी हे नेहमी लक्षात ठेवावे की सर्वशक्तिमान अल्लाहने आपल्याला सेवा करण्याची संधी दिली आहे. त्यामुळे सर्व प्रकारच्या वैयक्तिक स्वार्थाला सोडून सेवा करा. काही अधिकाऱ्यांच्या वागण्यात नम्रता नसल्याच्या तक्रारी आहेत. काही अधिकारी (सलाम) शुभेच्छांनाही प्रतिसाद देत नसल्याच्या बातम्या प्राप्त झाल्या आहेत. जे असे वागतात त्यांनी स्वतःला बदलावे. आणि प्रत्येक थोर आणि लहानशी प्रेमाने आणि नम्रतेने भेटले पाहिजे. तुमची नियुक्ती समाजाच्या सेवेसाठी केली गेली आहे, लोकांवर राज करण्यासाठी नाही. स्वतःमध्ये नम्रता विकसित करा. तुमच्यावर जी काही जबाबदारी सोपवण्यात आली आहे, ती पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. आपली सर्व क्षमतांचा वापर करून या सेवेला अदा करण्याचा प्रयत्न करा. हा विचार असेल तर योग्य ते करण्याची भावनाही निर्माण होईल आणि जमाअतचे सदस्यही सहकार्य करतील. लोक सहकार्य करत नसल्याची तक्रार करणारे बहुतांश अधिकारी लिहतात. जरी सदस्यांवरदेखील याची जबाबदारी आहे ज्यांना सेवा करण्यासाठी निवडण्यात आलेले आहे, की त्यांच्याकडून सहकार्य घ्यावा परंतु या सोबत लोकांसमोर उत्तम आदर्श ठेवण्याचे अधिकार्यांचेही कर्तव्य आहे.

त्याचप्रमाणे, क्षमायाचना करणे, सर्वशक्तिमान अल्लाहचे गुण-गाण करणे आणि आत्मनिरीक्षण करणे आवश्यक आहे. जर प्रबोधन (तरबियत) सचिवाने पाच वेळेची नमाज अदा केली नाही तर तो इतरांना नमाज अदा करण्यास कसे सांगू शकतो? तसेच एखाद्या अधिकाऱ्याने योग्य प्रमाणात अनुदान केलं नाही तर तो इतरांना आर्थिक त्यागाची जाणीव कशी करणार? प्रबोधन सचिवांनी जमाअतच्या लोकांना त्यांच्या उत्कृष्ट आदर्शांसह प्रेम आणि प्रेमाने प्रशिक्षण दिले तर ते क्रांतिकारी बदल घडवून आणू शकतात.

एखाद्या अधिकाऱ्याने आपल्या क्षेत्राच्या सुधारणेसाठी दररोज किमान दोन रकआत नमाज अदा केली पाहिजे. जर प्रबोधनाचे क्षेत्र सक्रिय झाले तर इतर क्षेत्रे आपोआप सत्तर टक्क्यांपर्यंत काम करू लागतील.

उपविभागांनीही सर्व स्तरांवर स्वतःला सक्रिय करावे. अधिकारी हे व्यासपीठावर बसण्यासाठी नसतात. प्रत्येक अधिकाऱ्याने कार्यकर्ता बनून आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. राष्ट्राचा नेता हा राष्ट्राचा सेवक असतो हे पवित्र पैगंबर (स.) यांचे म्हणणे लक्षात ठेवा. जमाअतच्या सदस्यांशी वैयक्तिक संबंध प्रस्थापित करणे, त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे हे अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. जमाअतची व्यवस्था एकमेकांबद्दल दयाळू आणि विचारशील राहण्यासाठी तयार करण्यात आली आहे ही भावना लोकांमध्ये बिंबवा. हा विचार आपल्याला अल्लाहच्या जवळ घेऊन जाणार आहे. अल्लाह खिलाफत ए अहमदियाला सदैव एकनिष्ठ सेवक प्रदान करो, जे आपले कर्तव्य रास्तरितीने पार पाडतील.

अधिकाऱ्यांनी लक्षात ठेवावे की (आमीला) सभा-बैठकांमध्ये सहभागी होऊन आपले मत मांडणे आणि मग हे ग्रहीत धरणे की माझे कर्तव्य पूर्ण झाले आहे, हे पुरेसे नाही. लोकांच्या सुधारणेसाठी योजना आखणे आणि नंतर त्याची अंमलबजावणी करणे खूप महत्वाचे आहे. उपलब्ध संसाधनांमध्ये राहून सर्वोत्तम धोरणासह लोकांच्या गरजांचा विचार करत राहा.

आजकाल नात्याच्या क्षेत्राने मोठे आव्हान घेतले आहे. यासाठी व्यापक नियोजनाची गरज आहे. जमाअतीय व्यवस्थापन आणि उपसंघटना यांनी एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे. याबाबत प्रबोधन विभागही सक्रिय करण्याची गरज आहे. जर आपल्या तरुणांना योग्य प्रबोधन दिले गेले तर आपण पवित्र प्रेषित (स.) यांचे हे वचन नेहमी आपल्यासमोर ठेवू शकतो की लग्नावेळी संपत्ती, कुटुंब आणि सौंदर्यापेक्षा धर्माला प्राधान्य देणे उत्तम आहे.

सार्वजनिक व्यवहाराचे क्षेत्रही खूप महत्त्वाचे आहे. या विभागाचे काम लोकांना शिक्षा ठोठावणे किंवा लोकांना चेतावणी देणे, असे सामान्यतः समजले जाते. या क्षेत्रात काम करणाऱ्यांनी हे जाणून घेतले पाहिजे की हे त्यांचे एकमेव काम नाही, तर तो केवळ नोकरीचा एक भाग आहे. आणि कठोर वृत्तीने आदेश करणे हे त्यांचे काम बिल्कूल नाही. हे तर फक्त आवश्यक अशा ठिकाणी करण्याची मुभा आहे आणि ते देखील शिफारस नंतरच त्याची अनुमती दिली जाते. प्रबोधन विभाग कार्यान्वित झाल्यास परस्पर वादाशी संबंधित उमूर आम्मा विभागाचे अनेक समस्या आपोआप सुटतील. उमूर आम्माचे काम लोकांना शिक्षा करणे नसून त्यांना शिक्षेपासून वाचवणे आहे आणि त्यासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत.

काही वेळा अधिकाऱ्यांच्या वागणुकीमुळे जमाअतच्या सदस्यांमध्ये जमाअतच्या व्यवस्थापनेविरुद्ध नाराजी निर्माण होते. मी जमाअतच्या सदस्यांना सांगू इच्छितो की खलिफाच्या कार्यालयात पोहोचणारे प्रत्येक पत्र उघडले जाते, वाचले जाते आणि त्यावर प्रक्रिया केली जाते. जर काही विलंब झाला असेल तर तो संबंधित जमाअतमध्ये आहे आणि अशा प्रकारे हे अधिकारी जमाअत आणि खलिफामध्ये अंतर निर्माण करतात.

ज्या अधिकाऱ्यांना गरजूं लोकांची मदत करण्याचे काम सोपवले आहे, त्यांनी विशेषतः त्यांच्या कर्तव्यात उशीर आणि ढिलाई करणे उचित नाही. पवित्र प्रेषित (स.) म्हणाले की जो कोणी गरीब आणि गरजावंत लोकांसाठी आपले दरवाजे बंद करतो, परमेश्वर त्याच्या गरजांसाठी स्वर्गाचे दरवाजे बंद करतो. त्यामुळे अशा विचारसरणीचा अधिकारी किंवा त्याच्या कार्यालयात कार्यकर्ता असल्यास त्याने अल्लाहच्या भीतीने लोकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी घाई करावी. अर्ज घेऊन तो ड्रॉवरमध्ये टाकून त्यावर दीर्घकाळ प्रक्रिया न करणे हा मोठा गुन्हा आहे.

पवित्र प्रेषित (स.) यांनी सांगितले आहे की, तुम्ही कुठेही असाल, अल्लाहचे भय बाळगा. लोकांशी चांगले वागणूक आणि दयाळूपणे वाग.

पवित्र प्रेषित (स.) यांनी अबू मुसा आणि मुआज बिन जबल यांना यमनच्या दोन स्वतंत्र भागांचे राज्यपाल म्हणून पाठवले आणि त्यांना अडचणी निर्माण न करता-सहजता निर्माण करण्याचा सल्ला दिला. तसेच प्रेम आणि आनंदाचा प्रसार करा आणि द्वेष वाढू देऊ नका, हा सल्ला सूचवला. हाच उपदेश, मार्गदर्शक तत्त्व म्हणून प्रत्येक अधिकाऱ्यासमोर नेहमी असणे अत्यावश्यक आहे. म्हणून प्रत्येक अधिकार्याचे हे कर्तव्य आहे की त्याने स्वतःमध्ये आध्यात्मिक सौंदर्य विकसित करावे. अल्लाह आम्हा सर्वांना याचे सामर्थ्य प्रदान करो. आमीन.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ۔
عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہُ اِنَّ اللّٰہَ یَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔